माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## तक्रार क्रमांक २८६/२०१६

जगन्नाथ पांडुरंग इटनारे,
रा. नांदुरा खुर्द, ता.नांदुरा,
जि.बुलडाणा

**तक्रारकर्ता**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत सिरसोडी,
ता. नांदुरा, जि.बुलडाणा

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तारी अधिकारी (पं),
पंचायत समिती नांदुरा,
ता. नांदुरा, जि. बुलडाणा

| माहिती करिता अर्ज /दाखल दि. | ज.मा.अ. यांचे उत्तराचा दि. | प्रथम अपिल अर्ज व दाखल दि. | प्रथम अपिल सुनावणीचा दि. | प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दि. | माहिती पुरविल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|
| ३०.०५.२०१६ | १६.०८.२०१६ | १८.०७.२०१६ | ११.०८.२०१६ | ११.०८.२०१६ | -- |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता 'ज.मा.अ.' तसेच प्रथम अपिलीय अधिकारी करिता 'प्र.अ.अ.'

तक्रार अर्ज व दाखल दिनांकः १९.०७.२०१६/ २२.०७.२०१६

**उपस्थित पक्षः** दि.२४.०२.२०२२ रोजी सर्व पक्ष गैरहजर.

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा
**दिनांक: २४ फेब्रुवारी २०२२**

## आदेश

१. प्रस्तुत तक्रार क्र.२८६/२०१६ मधील यापुर्वीचा दि.२०.०१.२०२२ रोजीचा आदेश वाचावे.

२. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.२०.०१.२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

> "९. वर्तमान ज.मा.अ. यांनी ग्राम पंचायतशी संबंधित माहिती तक्रारकर्ता यांना १५ दिवसात विनामुल्य नोदणीकृत डाकने किंवा व्यक्तीशः पावतीने उपलब्ध करुन द्यावी, व पोलिस पाटील संबंधित माहिती बाबत कोण ज.मा.अ. आहे, याचा तपशील तक्रारकर्ता यांना लेखी कळवावे.
>
> १०. तत्कालीन ज.मा.अ एन.पी. वानखेडे यांनी त्यांचे कालावधी मध्ये अर्जदार यांना माहिती का दिली नाही, व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नुसार शास्तीस पात्र का धरण्यात येवू नये याबाबतचा स्पष्टीकरण पुढील सुनावणीस हजर राहून सादर करावे.
>
> ११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नांदुरा तसेच विस्तार अधिकारी (पं) नांदुरा यांनी या आदेशाची प्रत तत्कालीन ज.मा.अ. एन.पी. वानखेडे यांना देवून त्यांचे छायाप्रत व दिनांकित पोच घेवून आयोगास सादर करावे."

३. दि.२०.०१.२०२२ रोजी वरीलप्रमाणे आदेश देण्यात येवुन प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २४.०२.२०२२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेतली असता अर्जदार व उत्तरवादी दोन्ही गैरहजर आहेत.

विवेचन

४. दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशाचा पुर्तता अहवाल सादर करण्याकरीता उत्तरवादी यांना संधी देणे गरजेचे आहे. दिनांक २०.०१.२०२२ चे आदेशातील परिच्छेद ११ मध्ये तत्कालीन

ज.मा.अ. यांचे नाव एन.पी.वानखेडे लिपीकीय त्रुटी असुन त्याचे आद्याक्षर एम.पी.वानखडे असल्याचे समजते. हजेरी पत्रकावर मंगेश वानखडे नमुद आहे.

आदेश

५. वर्तमान ज.मा.अ. यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशातील अ.क्र.९ नुसार अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नांदुरा यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत तत्कालीन ज.मा.अ. एम.पी.वानखडे यांना देवून त्यांचे छायाप्रत वर दिनांकित पोच घेवून पोच पावती आयोगास सादर करावे.

७. दिनांक २०.०१.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद ११ मध्ये तत्कालीन ज.मा.अ. यांचे नाव एन.पी.वानखेडे ऐवजी एम.पी.वानखडे वाचण्यात यावे.

८. तत्कालीन ज.मा.अ. मंगेश वानखडे यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशातील अ.क्र.१० नुसार त्यांचे म्हणणे एक महिन्यात आयोगास सादर करावे. तसेच पुढील सुनावणीस समक्ष याबाबत निवेदन सादर करण्याची संधीही देण्यात येत आहे.

८. पुढील सुनावणीस तत्कालीन ज.मा.अ. मंगेश वानखडे यांचे व्यतिरिक्त इतरांना हजर राहण्याची गरज नाही.

**पुढील सुनावणी दिनांक: १९.०४.२०२२, दुपारी २.०० वाजता,**
**आयोगाचे कार्यालयात**

डॉ. विनय कुमार सिन्हा
राज्य माहिती आयुक्त